# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

---

## 'राष्ट्रीय एकता दौड' व 'Soldierathon' साठी १५ नोव्हेंबर रोजी पुणे मेट्रोची सेवा पहाटे ३:४० वाजता सुरू होणार; धावपटूंसाठी दर १० आणि २० मिनिटांनी विशेष मेट्रो फेऱ्या.




पुणे शहरात रविवारी, १५ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या 'राष्ट्रीय एकता दौड' (Run for Unity) आणि 'Soldierathon' या दोन प्रमुख मॅरेथॉन स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व धावपटू, नागरिक आणि क्रीडाप्रेमींच्या सोयीसाठी पुणे मेट्रो प्रशासनाने पहाटे ३:४० वाजेपासून मेट्रो सेवा सुरु करण्याचा अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या दिवशी मेट्रो सेवा निर्धारित वेळेआधी उपलब्ध करून दिली जाणार आहे.

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त व देशाच्या अखंडतेचे आणि एकतेचे प्रतीक म्हणून 'राष्ट्रीय एकता दौड' चे आयोजन केले जाते. या दौडच्या माध्यमातून नागरिकांमध्ये राष्ट्रीय एकात्मता, सुदृढ आरोग्य आणि सार्वजनिक वाहतूक वापराचा संदेश दिला जातो. राष्ट्रीय एकात्मता, एकता आणि बंधुतेचा संदेश देणाऱ्या 'राष्ट्रीय एकता दौड' (Run for Unity) या विशेष उपक्रमात आणि सैनिकांच्या सन्मानार्थ आयोजित 'Soldierathon' मध्ये भाग घेणाऱ्या हजारो धावपटूंना कोणत्याही प्रवासाच्या अडचणीशिवाय आणि सार्वजनिक वाहतुकीचा वापर करून वेळेत पोहोचता यावे, यासाठी मेट्रो प्रशासनाने मेट्रो सेवेच्या नियोजनात खालीलप्रमाणे बदल व अतिरिक्त फेऱ्यांची व्यवस्था केली आहे:

**मेट्रो सेवेचे विशेष वेळापत्रक व नियोजन:**
पुणे मेट्रोच्या रामवाडी, वनाझ, पीसीएमसी आणि स्वारगेट या चार टर्मिनल मेट्रो स्थानकांवरून पहिली मेट्रो पहाटे ३:४० वाजता सुटेल.
विशेष सेवा (पहाटे ३:४० ते सकाळी ६:००): या कालावधीत पुणे मेट्रोच्या सर्व मार्गांवर दर २० मिनिटांनी मेट्रो गाड्या धावतील.
इंटरचेंज ते कार्यक्रमाचे ठिकाणासाठी अतिरिक्त मेट्रो फेऱ्या (धावपटूंसाठी विशेष सोय): मॅरेथॉनमध्ये सहभागी होणाऱ्या प्रवाशांची सोय लक्षात घेता, जिल्हा न्यायालय इंटरचेंज मेट्रो स्थानक येथून वनाज व पीसीएमसीच्या दिशेने दर १० मिनिटांनी अतिरिक्त मेट्रो सेवा उपलब्ध करण्यात येणार आहे. यामुळे 'राष्ट्रीय एकता दौड' (Run for Unity) साठी लोकमान्य टिळक चौकात (अलका चौकात) जाणाऱ्या धावपटूंसाठी वनाझच्या मार्गावर, तर Soldierathon मध्ये सहभागी होणाऱ्या धावपटूंसाठी पीसीएमसीच्या मार्गावर संबंधित ठिकाणे वेळेवर पोहचण्यासाठी मेट्रो सेवेची सोय उपलब्ध असणार आहे.

**दर २० मिनिटांनी मेट्रो**
(संपूर्ण मेट्रो मार्गांवर)
मार्गिका १ –
पीसीएमसी मेट्रो स्थानक ते स्वारगेट मेट्रो स्थानक
मार्गिका २ –
वनाझ मेट्रो स्थानक ते रामवाडी मेट्रो स्थानक

**दर १० मिनिटांनी अतिरिक्त मेट्रो सेवा**
(जिल्हा न्यायालय इंटरचेंज मेट्रो स्थानक येथून)
मार्गिका १ –
जिल्हा न्यायालय मेट्रो स्थानक ते पीसीएमसी मेट्रो स्थानक
मार्गिका २ –
जिल्हा न्यायालय मेट्रो स्थानक ते वनाझ मेट्रो स्थानक

इंटरचेंज (मार्गिका बदल) सुविधा: लाईन १ (पीसीएमसी ते स्वारगेट) आणि लाईन २ (वनाज ते रामवाडी) वरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना जिल्हा न्यायालय इंटरचेंज मेट्रो स्थानक येथे सहजरीत्या मार्गिका बदलता येईल.

पुणे मेट्रो प्रशासनाने मॅरेथॉनमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व धावपटूंना, नागरिकांना व क्रीडाप्रेमींना आवाहन केले आहे की, त्यांनी या विशेष मेट्रो सेवेचा अधिकाधिक लाभ घ्यावा आणि शहरातील वाहतूक कोंडी टाळून सुरक्षित व जलद प्रवासाचा आनंद घ्यावा.